दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

मुख्य संपादक : अजश भांगे

बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार, दि.७ फेब्रुवारी २०२५ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक-११३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

## लाडकी बहिणी योजनेच्या प्रसिद्धीसाठी ३ कोटींचा खर्च

**मुंबई**–लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर विधानसभा निवडणुकीत महायुती सरकारला राज्यात मिळालेल्या यशाचे श्रेय लाडकी बहीण योजनेला दिले जाते. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या आधी महायुती सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. लाडकी बहिणी योजनेच्या प्रसिद्धीसाठी तीन कोटी रुपयांच्या खर्चाला राज्य सरकारच्या वतीने मान्यता देण्यात आली आहे. मात्र, दुसरीकडे वित्तीय तूट भरून काढण्यासाठी आता शिव भोजन थाळी आणि आनंदाचा शिधा या योजनांना ब्रेक लावण्याची शक्यता वर्तवली जात आहे.राज्य सरकारच्या लाकडी बहिण योजनेवर मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात आला आहे. मात्र या योजनेवर झालेल्या मोठ्या प्रमाणातील खर्चामुळे आता राज्य सरकार इतर काही योजना बंद करण्याच्या तयारीत असल्याची चर्चा सुरू झाली आहे. यात शिव भोजन थाळी आणि आनंदाचा शिधा अशा योजनांचा समावेश आहे. त्यामुळे या योजनांना आता ब्रेक लागणार असल्याचे बोलले जात आहे.मुख्यमंत्री माझी लाडकी बहिणी योजना विधानसभा निवडणुकीच्या आधी जाहीर करण्यात आली होती. या योजनेला महिला वर्गातून मोठी लोकप्रियता मिळाली.

# खबरदार ! वाल्मीक कराड आणि धनंजय मुंडे यांच्या सबंधित बातम्या बघितल्या तर तुझा संतोष देशमुख करू

## केज तालुक्यातील तरनळी येथे एका तरुणाला कोयता आणि लोखंडी रॉडने जबर मारहाण


### वाल्मीक कराड व धनंजय मुंडे यांच्या बातम्या का पाहतो म्हणून डोक्यात लोखंडी पाईप मारून केले गंभीर जखमी

### मारहाण करणारे दोघे संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फरार आरोपी कृष्णा आंधळेचे समर्थक असल्याची चर्चा

**केज । गौतम बचुटे**

वाल्मीक कराड आणि धनंजय मुंडे यांचे मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी संबंधित बातम्या मोबाईलवर बघत असताना तू त्या बातम्या का पाहतो? असे म्हणून दोघा युवकांनी एका गृहरक्षक दलाच्या जवानाच्या डोक्यात लोखंडी रॉडने मारहाण करून गंभीर जखमी केले. त्या प्रकरणातील फरार आरोपींना धारूर पोलिसांनी कर्नाटक मधून ताब्यात घेतले आहे. आरोपींना ताब्यात घेण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा आणि पोलीसांचे पाच पथके तैनात करण्यात आले असून आरोपींच्या शोधासाठी पोलीस रवाना करण्यात आली होती.

या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील तरनळी येथे दि. ५ फेब्रुवारी रोजी गृहरक्षक दलात सेवा करीत असलेले जवान अशोक मोहिते हे तरनळी येथील रमाई चौकात असलेल्या तुळजा भवानी इंजिनिअरिंग शॉप नावाच्या एका वेल्डिंग वर्क शॉप मध्ये खुर्चीवर बसून संतोष देशमुख हत्या प्रकरणातील संशयित आरोपी वाल्मीक कराड आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्या निगडित असलेल्या बातम्या मोबाईलवर पहात होते . त्या वेळी तेथे वैजनाथ भारत बांगर आणि अभिषेक सिद्धेश्वर सानप हे दोघे मोटार





सायकलवरून येथे आले. या वेळी अशोक मोहिते हे वाल्मीक कराड व धनंजय मुंडे यांच्या सबंधित बातम्या पाहात असल्याचे त्या दोघांच्या निदर्शनास आले. याचा राग येवून दोघांनी अशोक मोहिते यांच्यावर लोखंडी रॉड व कोयत्याने हल्ला करून त्याला लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. तसेच जर यापुढे वाल्मिक कराड व धनंजय मुंडे यांच्या विरोधातील बातम्या पाहिल्यास तर तुझा संतोष देशमुख करू. अशी धमकी दिली. मारहाण केल्या नंतर अशोक मोहिते व त्याचा मावस भाऊ याने आरडाओरड केल्यानंतर गावकरी जमा झाले. त्या दरम्यान आरोपी वैजनाथ बांगर व अभिषेक सानप हे त्यांची मोटार सायकल क्र. (एम एच-४४/आर-९२९४) वरून पळून गेले.

**आरोपीला कर्नाटक मधून घेतले ताब्यात**

मारहाणीत अशोक मोहिते याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून रक्तस्राव देखील झालेला आहे. त्याच्यावर अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचार केल्या नंतर त्याला लातूर येथे हलविण्यात आले आहे. सध्या तो बेशुद्धावस्थेत असल्याची माहिती त्याच्या नातेवाईकांनी दिली आहे. या प्रकरणी अशोक मोहिते यांचे मावस भाऊ बालासाहेब भोसले यांच्या तक्रारी वरून धारूर पोलीस ठाण्यात वैजनाथ भारत बांगर व अभिषेक सिद्धेश्वर सानप यांच्या विरुद्ध गु. र. नं. ३५/२०२५ भा. न्या. सं. ११५(२),११८(३), ३५१(२), ३५१(३), ३५२ आणि ३(५) नुसार व तपास पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.आरोपी वैजनाथ बांगर व अभिषेक सानप या आरोपींना ताब्यात घेण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे तीन तर पोलीसांचे दोन असे एकूण पाच पथके विविध ठिकाणी रवाना केले होते. त्यासाठी १६ पोलीस कर्मचारी त्यांचा तपास घेत असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी दिली होती.अशोक मोहिते प्रकरणी तपासात त्रुटी राहू नयेत किंवा आरोपी तात्काळ ताब्यात घेण्यासाठी ज्या ठिकाणी अशोक मोहिते याच्यावर हल्ला करण्यात आला. त्या ठिकाणी पोलिसांची फॉरेन्सिक टीम आणि श्वान पथकाला पाचारण करण्यात आले आहे. पोलीस श्वान पथक आणि फॉरेन्सिक टीम यांच्या माध्यमातून सखोल तपास करीत आहेत.मागील पंधरा दिवसा पूर्वी सुद्धा झाले होते यांचे भांडण : अशोक मोहिते आणि वैजनाथ बांगर व अभिषेक सानप यांच्या एका सलुनच्या दुकानात भांडण झाले होते. मात्र ते मिटले होते. अशी देखील माहिती मिळते आहे .

### कर्नाटक मधून आवळल्या गुन्हेगारांच्या मुसक्या

**वाल्मीक कराड आणि धनंजय मुंडे यांच्या बातम्या का बघतोस ? म्हणून गृहरक्षक दलाचा जवान अशोक मोहिते यांना गंभीर मारहाण करणारे वैजनाथ बांगर, अभिषेक सानप यांच्या बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे, हेडकॉन्स्टेबल अशोक कदम, सत्यप्रेम मिसाळ, दिनकर पुरी यांच्या पथकाने आरोपींचा पाठलाग करत कर्नाटक मधील कांगवड येथून दोघांच्या मुसक्या आवळल्या.**

### आरोपींना लवकर अटक करण्याची केली होती मागणी

**अशोक मोहिते याचे वडील शंकर मोहिते आणि गावकऱ्यांनी अशोक मोहिते याला मारहाण करणारे तरुण वैजनाथ बांगर व अभिषेक सानप हे मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडातील मकोका, खंडणी आणि हत्या प्रकरणातील पोलिसांना वॉन्टेड असलेला फरार सराईत आरोपी कृष्णा आंधळे याचे समर्थक असून ५ फेब्रुवारी रोजी कृष्णा आंधळे याचा वाढदिवस असल्याने त्याचे फोटो मोबाईल डीपी आणि स्टेटसवर ठेवून दहशत निर्माण करीत असल्याची देखील माहिती गावकऱ्यांनी दिली आहे. त्यांना तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात आली होती.**

# ऊसतोड मजूर राठोड दांपत्याच्या कुटुंबियांना गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठाणने दिला मदतीचा हात

## ना.पंकजाताई मुंडे यांनी दूरध्वनीद्वारे संवाद साधून केले कुटुंबाचे सांत्वन, प्रितमताई मुंडे यांनी सुपूर्त केला मदतीचा धनादेश

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील आश्रमशाळा तांडा येथील मयत ऊसतोड मजूर दांपत्य अनिल राठोड आणि आरती राठोड यांच्या कुटुंबियांची माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांनी सांत्वनपर भेट घेतली. याप्रसंगी राठोड कुटुंबाचे सांत्वन करून गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने त्यांनी आर्थिक मदतीचा धनादेश सुपूर्द केला.

काही दिवसांपूर्वी जिल्ह्यातील ऊसतोड मजूर राठोड दांपत्याचा कर्जत-पाथर्डी मार्गावर रस्ते अपघातात मृत्यू झाला होता. राज्याच्या पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री तथा भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी राठोड यांच्या कुटुंबाला गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने आर्थिक मदत देण्याचे



जाहीर केले होते. माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांनी आज त्यांच्या सुचनेनुसार राठोड कुटुंबाची भेट घेऊन त्यांना गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान मार्फत आर्थिक मदत सुपूर्द केली.यावेळी ऊसतोड ना.पंकजाताई मुंडे यांनी राठोड कुटुंबाशी दूरध्वनीद्वारे संवाद साधला. आम्ही तुमच्या पाठीशी आहोत, सर्वांची काळजी घ्या, आम्ही नेहमी तुमच्या सोबत आहोत' अशा शब्दात त्यांनी कुटुंबाचे सांत्वन केले. तसेच प्रितमताई मुंडे यांनी देखील यावेळी संवेदना व्यक्त करून राठोड परिवाराच्या पाठीशी राहण्याचा विश्वास दिला.

# मुदती पूर्वी मुदत ठेव परत देण्यासाठी पोस्टातील कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करून धमकी

## परसस्परा विरुद्ध गुन्हे दाखल

**केज । गौतम बचुटे**

पोस्टातील खात्यात जमा केलेली मुदत ठेव ही मुदतीपूर्वी परत देण्यावरून पोस्टातील कर्मचाऱ्यांना धमकी देत शिवीगाळ करून शासकीय कामात अडथळा आणला म्हणून दोघा विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून ठेवीदारांच्या तक्रारी वरून पोस्टातील तीन कर्मचाऱ्या विरुद्ध परस्पर विरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील नरसिंग रामभाऊ ठोंबरे यांनी त्यांच्या पोस्टातील दोन बचत खात्यात एक वर्षा पूर्वी पाच वर्षाच्या मदतीवर मुदत ठेव म्हणून म्हणून अनुक्रमे ४२ हजार रु. आणि ५० हजार रु. रक्कम जमा केलेली आहे.

दि. ६ फेब्रुवारी रोजी ११:०० वा. च्या सुमारास केज येथील पोस्ट ऑफिस मध्ये नरसिंग रामराव ठोंबरे आणि त्याचा मुलगा शुभम ठोंबरे हे गेले आणि त्यांनी पोस्ट मास्तर प्रशांत पाटील म्हणाला की, पोस्टातील मुदत ठेव बंद करून पैसे परत द्या. असे म्हणून त्यांनी लेखी अर्ज सुध्दा दिला. त्यावर पोस्ट मास्तर प्रशांत पाटील त्यांना म्हणाले की, तुमच्या मुदत ठेव ही पाच वर्ष मुदतीची असून एक वर्षात ती बंद करून पैसे परत देता येणार नाहीत. असे म्हणताच नरसिंग ठोंबरे याने पोस्टमास्तर पाटील आणि त्यांच्या स्टाफला शिविगाळ केली. त्याचे सोबत आलेला त्याचा मुलगा शुभम नरसींग ठोंबरे याने पण शिविगाळ करुन म्हणाला की, तुम्ही पोस्टाच्या बाहेर निघा. तुम्हाला बघतो. असे म्हणून धमकी देवुन शासकीय कामात अडथळा केला.

या प्रकरणी पोस्ट मास्टर पाटील यांच्या तक्रारी वरून नरसिंग ठोंबरे आणि त्यांचा मुलगा शुभम ठोंबरे यांच्या विरूद्ध गुन्हा दाखल केला आला आहे.

तर नरसिंग ठोंबरे यांनी देखील केज पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, उंदरी येथील पोस्ट ऑफीस मध्ये पोस्ट मास्टर वैष्णवी गुजाडे यांचेकडे मागील एक वर्षापुर्वी एक वर्षासाठी मुदत खाते काढले. त्यावेळी पोस्टमास्तर गुजाडे त्यांना म्हणाल्या की, तुम्हाला पैशाची अडचण असेल तेव्हा कधीही पैसे काढता येतील. नरसिंग ठोंबरे यांच्या पत्नीला अर्धांग वायूचा आजार झाल्याने ते पैसे काढण्यासाठी गेले असता त्यांची मुदत ठेव ही पाच वर्ष मुदतीची असल्याचे समजले. यावर गुजाडे त्यांना म्हणाल्या की, केज येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटून पैसे परत देण्यासाठी त्यांचे पासबुक घेतले. परंतु दहा दिवसांचा कालावधी उलटून गेल्या नंतर त्यांनी त्यांना पैसे दिले नाहीत. म्हणून नरसिंग ठोंबरे व त्यांचा मुलगा शुभम ठोंबरे हे दोघे केज येथील पोस्टात गेले. त्यावर सदर ठेव ही पाच वर्षाची असल्याने ती मोडता येत नाही. असे सांगितले आणि त्यांना शिवीगाळ केली.

अशा आशयाच्या तक्रारी वरून पोस्ट मास्टर प्रशांत पाटील, घोडके मॅडम, आणि आकुसकर या तिघांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणी पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेडकॉन्स्टेबल श्रीकांत चौधरी हे तपास करीत आहेत.

# रेल्वे प्रश्न सोडवण्यासाठी धारूर-वडवणीतील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे प्रितमताई मुंडेंना साकडे

### संयुक्त बैठकीसाठी प्रितमताईंचे पंकजाताईंसह संबंधितांना पत्र

## प्रलंबित प्रश्न मार्गी लागल्यास रेल्वे प्रकल्पाला मिळणार गती

**दिंदृड । प्रतिनिधी**

नगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी वडवणी आणि धारूर तालुक्यातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान, भूसंपादन प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी आणि मावेज्यांशी संबंधित समस्यांबाबत शेतकऱ्यांनी त्यांचे मत मांडले.रेल्वे प्रकल्प अंतिम टप्प्यात असतानाही काही तांत्रिक आणि प्रशासनिक अडचणींमुळे वडवणी आणि धारूर तालुक्यातील काम रखडले आहे. वारंवार निर्माण होणाऱ्या भूसंपादन व मावेजा संदर्भातील अडचणींवर त्वरित तोडगा काढण्यासाठी स्थानिक शेतकऱ्यांनी प्रितमताईंना साकडे घातले. शेतकऱ्यांचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकून घेत, त्यांनी या विषयावर तातडीने हालचाली सुरू केल्या.डॉ. प्रितमताई मुंडे यांनी या प्रकरणात लक्ष घालून राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांना पत्र पाठवले. तसेच, लवकरात लवकर महसूल, भूसंपादन, रेल्वे आणि कृषी



विभागाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक बोलावण्याची विनंती केली.याशिवाय, प्रितमताईंनी स्थानिक उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि रेल्वे अधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून शेतकऱ्यांच्या अडचणींची माहिती दिली आणि त्यावर लवकर निर्णय घेण्याचे आवाहन केले. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी प्रितमताईंनी घेतलेल्या पुढाकाराचे कौतुक करत, त्यांच्या हस्तक्षेपामुळे समस्या लवकर सुटतील आणि प्रकल्पाला गती मिळेल, अशी आशा व्यक्त केली.यापूर्वी अनेकदा मागणी करूनही प्रश्न सुटले नसल्याने, आता होणाऱ्या संयुक्त बैठकीत प्रितमताईंनी प्रत्यक्ष उपस्थित राहावे, अशी आग्रहाची मागणी शेतकऱ्यांनी केली.

# धनंजय मुंडे यांनी दमानियांचे आरोप फेटाळले सनसनाटी करून प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न

**मुंबई (वृत्तसंस्था)**–अंजली दमानिया यांनी माझ्यावर केलेले सर्व आरोप खोटे आहेत. हे केवळ त्यांच्या स्वभावाप्रमाणे सनसनाटी निर्माण करण्यासाठी केले गेले आहेत. कृषी विभागात मी मंत्री असतानाच्या काळात झालेली सर्व खरेदी ही शासन नियमानुसारच झाली असल्याचा दावा धनंजय मुंडे यांनी केला आहे.

सनसनाटी, धादांत खोटे आरोप करायचे आणि स्वतःची प्रसिद्धी मिळवायची, याव्यतिरिक्त याच्यात मला काहीही आढळत नसल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. गेल्या ५९ दिवसापासून माझ्यावर मीडिया ट्रायल चालू आहे. ते का चालू आहे? कोण चालवतेय? हे मला माहिती नाही, असे देखील मुंडे यांनी म्हटले. यावेळी त्यांनी अंजली दमानिया यांचा अंजली बदनामिया असा उल्लेख करत टोला हाणला.धनंजय मुंडे कृषीमंत्री असताना त्या विभागात मोठा भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप अंजली दमानिया यांनी केला होता. त्यांच्या या आरोपाला मुंडे यांनी सडेतोड उत्तर दिले आहेत. आम्ही शांत बसलो म्हणजे आम्हाला बोलता येत नाही, असा होत नाही. मुख्यमंत्र्यांचे अधिकार हे मुख्यमंत्र्यांना ऐवजी दमानियांना माहित आहे का? असा प्रश्न देखील मुंडे यांनी उपस्थित केला. अंजली दमानिया यांचा खोटेपणा हा केवळ मला बदनाम करण्यासाठी असल्याचे त्यांनी म्हटले आहे. अंजली दमानिया यांनी आजपर्यंत केलेले कोणतेच आरोप खरे निघाले



नसल्याचेही मुंडे यांनी म्हटले आहे.अंजली दमानिया जेव्हापासून आरोप करतात तेव्हापासून आजपर्यंत त्यांनी केलेला एकही आरोप सिद्ध झाला आहे का? असा प्रश्न देखील धनंजय मुंडे यांनी उपस्थित केला आहे. या आधी ज्या नेत्यांवर त्यांनी आरोप केले, त्या नेत्यांकडे जाण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. असे देखील मुंडे यांनी म्हटले आहे. संतोष देशमुख यांचे आरोपी मारले गेले आहेत, असा दावा देखील दमानिया यांनी केला होता. हा देखील दमानियांचा खोटेपणा होता, असे देखील मुंडे यांनी म्हटले आहे. आरोप करण्याचे काम ज्यांनी केले, त्यांना शुभेच्छा. मात्र, माझे राजकीय आयुष्य मायबाप जनतेवर अवलंबून असल्याचा दावा देखील मुंडे यांनी केला आहे.मी मंत्री असताना कृषी विभागात जी प्रक्रिया राबवली गेली ती पूर्ण पूर्व मान्यतेनेच राबवली गेली असल्याचा दावा मंत्री धनंजय मुंडे यांनी केला आहे. त्यामध्ये विविध कंपन्यांकडून स्पर्धात्मक दर मागवले गेले होते. त्यात जास्तीत जास्त कंपन्यांनी सहभाग व्हावे म्हणून दोन वेळा निविदा प्रक्रियेला मुदतवाढ देण्यात आली होती. भ्रष्टाचार करायचा असता तर दोन वेळा मुदत वाढ देईल का? असा सवाल मुंडे यांनी उपस्थित केला.

## संपादकीय..

# तुमची आर्थिक समृद्धी रोखणाऱ्या सवयी

प्रत्येक व्यक्ती निश्चित हेतूने गुंतवणूक करीत असते. या हेतूमध्ये अनेकदा आपल्याला खरंखुरं आर्थिक स्वातंत्र्य मिळावं, खर्च करताना पैसे आपल्या मर्जीनुसार करता यावेत अशी त्यांची अपेक्षा असते. कोणतीही गुंतवणूक स्वतः न करता अनपेक्षितपणे काहीजण श्रीमंत बनतात. त्यांच्याकडे केवळ भरपूर पैसे आहेत म्हणून आपण त्यांना श्रीमंत असे म्हणू शकतो, समृद्ध नव्हे. असलेले पैसे योग्य रीतीने गुंतवणूक करून वाढवता आले किंवा त्यात भर घालता आली नाही तरी निदान ते सांभाळता येईल एवढे किमान कौशल्य आपल्याकडे असेल, तर आर्थिकदृष्ट्या आपण खरोखरच समृद्ध झालो असे म्हणता येईल. हा मार्ग वाटतो तितका सोपा नाही. त्यात अनेक अडथळे आहेत. आपल्या अनेक आर्थिक सवयी या आपल्याला मध्यमवर्गातच ठेवतात अथवा त्याकडे ढकलतात, त्यांचा थोडक्यात आढावा घेऊ या.

उदय पिंगळे

कोणतेही निश्चित आर्थिक ध्येय नसणे – अनेक व्यक्ती अशा आहेत त्यांच्यापुढे कोणतेही आर्थिक ध्येय नसते. त्यामुळे बचत किंवा त्यापुढे जाऊन गुंतवणूक करावी असे त्यांना वाटतच नसल्याने त्यांना समृद्धी सोडाच श्रीमंतही होता येत नाही. तेव्हा आर्थिक दृष्टीने समृद्ध व्हायचं असेल तर आपले उद्दिष्ट असणे आणि ते पूर्ण करण्याचे प्रामाणिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. स्वतःच्या आर्थिक उद्दिष्टांना प्राधान्य न देणे–काही व्यक्ती अशाही आहेत ज्यांच्याकडे निश्चित आर्थिक उद्दिष्ट आहे; परंतु त्यांचा प्राधान्यक्रम गरजा आणि चैन यासाठी खर्च करण्याकडे आहे. त्यामुळे ते पुरेशी गुंतवणूक करू शकत नाहीत, आर्थिकदृष्ट्या समृद्ध होऊ शकत नाहीत. फारच थोडे लोक उद्दिष्टांवर लक्ष ठेवून प्रथम बचत अथवा गुंतवणूक करतात. मिळालेल्या पैशाचे नियोजन करून गुंतवणूक केल्यास, राहिलेले पैसे परिस्थितीनुसार खर्च कसे करायचे ते आपोआप समजत जाईल.

अनावश्यक कर्ज घेणे – आर्थिक क्षेत्रातील स्पर्धेमुळे सध्या कुणालाही सहज कर्ज उपलब्ध होत आहे. त्यासाठी कोणतेही तारण ठेवावे लागत नसल्याने, अनेकदा अनावश्यक कारणांसाठी कर्ज घेतले जाते. स्वतःला राहण्यासाठी घर, उच्च शिक्षण, व्यवसायाची वृद्धी यासाठी घेतलेले कर्ज हे आवश्यक कर्ज म्हणता येईल. घर आणि उच्च शिक्षण हे गरजेचे; परंतु आता आवाक्यातील नसलेले त्यामुळे कर्ज घ्यावे लागणे अपरिहार्य आहे. व्यवसाय वृद्धीसाठी घेतलेल्या/ कर्जातून भविष्यात उलाढाल होईल, वाढीव परतावा मिळू शकतो म्हणून ते कर्ज आवश्यक कर्ज समजावे. याउलट चैनीच्या वस्तू खरेदी करण्यासाठी घेतलेले कर्ज अनावश्यक म्हणता येईल. अनेकदा यासाठी हप्ता (एचख) किती पडेल हे सांगितले जाते. त्याकडे पाहून कर्ज खूप क्षुल्लक वाटू शकते. यासाठी व्याज द्यावे लागते. वरचेवर सहज उपलब्ध असणारे कर्ज घेतल्यास कर्ज फेडण्यासाठी नवे कर्ज अशी परिस्थिती निर्माण होऊन तुमची वाटचाल दिवाळखोरीकडे सुरू होते. पुरेसा राखीव निधी नसणे – अचानक काही आर्थिक संकट आलं, जसे मोठे आजारपण, अपघात, नोकरी जाणे अशा परिस्थितीत काही नियमित खर्च हे करावेच लागतात. त्यांना पर्याय नसतो. स्वतःकडे ६ ते १२ महिने खर्चास पुरेल एवढा निधी असेल आणि तो सहज काढून घेता येत असेल तर तो उपयोगी पडतो. नाहीतर अधिक व्याजदराने कर्ज घ्यावे लागते. उधार उसनवारी करावी लागते. असा निधी निर्माण करून आपली आर्थिक स्थिती मजबूत राहते. कुणाकडे हात पसरावे

लागत नाहीत. उत्पन्न, खर्च, मालमत्ता, दायित्व किती ते माहिती नसणे – कोणतेही आर्थिक उद्दिष्ट नसलेल्या व्यक्तीना या गोष्टी माहिती नसतात. याचा वेळोवेळी आढावा घेऊन त्याप्रमाणे गुंतवणूक निर्णय घेण्याची सवय असल्यास त्यातील अनावश्यक गोष्टी टाळता येतात. आवश्यक तरतुदी/धोरणात्मक बदल करता येतात. आर्थिक नुकसान करणाऱ्या महाग सवयी – अपवादात्मक प्रसंगीच क्षम्य असलेल्या आणि अलीकडे सर्रास अंगवळणी पडलेल्या काही सवयी उदा. हॉटेलिंग करणे, तत्काळ कोट्यातून प्रवास तिकीट काढणे, शेवटच्या क्षणी सहलीस निघणे, आयत्या वेळी विमानाचे तिकीट काढणे, बाहेर खाणे, ब्रॅण्डेड वस्तूच खरेदी करणे, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करण्याऐवजी खासगी वाहतुकीचा वापर करणे, सुजाण ग्राहक हा नेहमी जागृत असायला हवा. त्याने योग्य दर्जा आणि वाजवी किंमत (स्वस्त नव्हे) यांचा स्वतः नियमित शोध घ्यावा आणि नियोजन करावे. अगदीच नाईलाज असेल तरच अन्य पर्याय आजमावेत.

गुंतवणूक न करता केवळ त्यांच्या संधी शोधत बसणे – गुंतवणुकीचे अनेक पर्याय उपलब्ध असताना विशिष्ट पर्यायाची वाट पाहण्यासाठी अनेकजण आपले पैसे तसेच बचत खात्यात ठेवतात. त्यामुळे गुंतवणूक न होता नुकसानच होते. फार काळ पैसे तसेच गुंतवणूक न करता ठेवण्याऐवजी आपल्याकडे एकच पर्याय नसून अन्य पर्यायही माहिती असायला हवेत.

कर आकारणी सवलती संबंधित माहिती नसणे – भांडवल बाजाराशी संबंधित अनेक गुंतवणूक प्रकार आहेत, त्यावर करसूट आणि सवलतीच्या एकसमान दराने कर आकारणी होते. अनेकांना हे माहिती नसल्याने ते आपली गुंतवणूक अन्य प्रकारात करून त्यावर कर देतात. प्राथमिक आर्थिक विषयांची कमी माहिती – आर्थिक संबंधात अशा अनेक प्राथमिक गोष्टी म्हणजे उद्दिष्ट, अंदाजपत्रक, देखभाल खर्च माहीत असतील तर योग्य पर्याय गुंतवणूकदार निवडू शकतात. उदा. घर, गाडी विकत घेणे याऐवजी भाड्याने घेणे. असलेले घर/ गाडी बदलून मोठे घर, आलिशान गाडी घेण्याचे फायदे / तोटे हे माहीत असेल तर योग्य तोच खर्च केला जातो. सहज सुचलेल्या या यादीत अनेक गोष्टींची अजूनही भर टाकता येईल. बऱ्याच जणांना त्या कंजूषपणा दर्शविणाऱ्या वाटतील. आवश्यक असेल तर त्या नक्की कराव्यात त्यासाठी मागे–पुढे पाहू नये. हा समतोल साधत राहिल्यासच आपण सुजाण गुंतवणूकदार बनून आपल्या संपत्तीत भर घालू शकतो.

# शंभर कोटी मुले हवामानबदलाच्या विळख्यात



जगभरातील शंभर कोटींहून अधिक, विशेषत: भारत, पाकिस्तान, अफगाणिस्तान, सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिक आणि नायजेरिया अशा कमी विकसित देशांमध्ये राहणाऱ्या मुलांना हवामानबदलामुळे वाढत्या धोक्यांचा सामना करावा लागतो. त्यांना आधीच स्वच्छ पाण्याची अनुपलब्धता, शिक्षणाचा अभाव, आरोग्यसेवांची कमतरता अशा समस्यांचा सामना करावा लागतो. त्याबरोबर आता या धोक्याचा सामना करावा लागत आहे.

'युनायटेड नेशन्स चिल्ड्रेन्स फंड' (युनिसेफ)ने नुकताच एक अहवाल प्रसिद्ध केला. त्यात येत्या काही वर्षांमध्ये मुलांच्या दृष्टीने पर्यावरणाच्या वाढत्या धोक्यांबद्दल गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली. या अहवालानुसार, येत्या काही दशकांमध्ये म्हणजे २०५० पर्यंत मुलांना उष्णतेच्या लाटा, पूर आणि जंगलातील आगीसारख्या नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागणार आहे. अहवालानुसार २०५० च्या पिढीला आताच्या तुलनेत जास्त उष्णतेचा सामना करावा लागू शकतो. अभ्यासानुसार, २०५० पर्यंत जगातील तापमान आताच्या जवळपास आठपट वाढू शकते. याचा अर्थ असा आहे की, मुलांना अधिक तीव्र उष्णतेचा सामना करावा लागेल. 'युनिसेफ'च्या अहवालानुसार येत्या काही वर्षांमध्ये उष्णतेमुळे जंगलात आग लागण्याचा धोका वाढणार आहे. वातावरणातील बदलामुळे, वाढलेली उष्णता–पूर–दुष्काळ यामुळे मुलांच्या भवितव्यासाठी मोठी आव्हाने निर्माण होऊ शकतात. 'युनिसेफ'च्या ताज्या अहवालात म्हटले आहे की, हवामानबदलाच्या धोक्याचा सामना करणाऱ्या या मुलांसाठी तातडीने आणि प्रभावी पावले उचलण्याची गरज आहे.जगातील कोट्यवधी मुले सध्या मोठ्या धोक्याच्या छायेखाली आहेत. हवामानबदलामुळे मोठा विद्ध्वंस होऊ शकतो. जगातील ३३ देशांमध्ये येणारा काळ मुलांसाठी सर्वात धोकादायक असू शकतो. हवामान बदल आणि पर्यावरणीय समस्यांचा या देशांवर सर्वाधिक परिणाम होऊ शकतो. आश्चर्याची बाब म्हणजे जगातील हरितगृह वायूंच्या उत्सर्जनात यादीत समाविष्ट असलेल्या या देशांचे योगदान फारच कमी आहे. यादीत समाविष्ट असलेले हे ३३ देश, ज्यात भारताचाही समावेश आहे, एकत्रितपणे केवळ नऊ टक्के वायू उत्सर्जित करत आहेत. असे असूनही, या देशांमधील मुलांना उष्णतेच्या लाटा, पूर, दुष्काळ आणि इतर नैसर्गिक आपत्तींसारख्या वातावरणातील बदलांमुळे सर्वाधिक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या समस्येमध्ये सर्वात जास्त सहभाग असलेले देश सुमारे ७० टक्के वायू उत्सर्जनासाठी जबाबदार आहेत. यापैकी फक्त एका देशाला मुलांसाठी सर्वाधिक धोका असलेल्या देशांमध्ये स्थान देण्यात आले आहे.

'चिल्ड्रेन क्लायमेट रिस्क इंडेक्स'नुसार, मध्य आफ्रिकन रिपब्लिकला ८.७ गुणांसह मुलांसाठी हवामानबदलाचा सर्वाधिक धोका असलेला देश म्हणून स्थान देण्यात आले आहे. यानंतर नायजेरिया आणि चाड ८.५ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहेत. भारत ७.४ गुणांसह २६ व्या स्थानी आहे. पाकिस्तान (७.७ गुण) आणि अफगाणिस्तान, बांगलादेश, इथियोपिया ७.६ गुणांसह चौदाव्या आणि पंधराव्या स्थानी आहेत. लिंचेस्टीन हा युरोपियन देश २.२ गुणांसह मुलांसाठी हवामान बदलापासून सर्वात सुरक्षित देश मानला गेला असून या यादीत शेवटच्या म्हणजेच १५३ व्या क्रमांकावर आहे. युनिसेफ ही एक आंतरराष्ट्रीय संस्था आहे, जी मुले आणि मातांच्या हक्कांचे आणि कल्याणाचे रक्षण करण्यासाठी कार्यरत आहे. हा संयुक्त राष्ट्रांचा एक भाग आहे. १९४६ मध्ये विशेषतः दुसऱ्या महायुद्धानंतर जगभरातील मुलांना, भेडसावणाऱ्या समस्या लक्षात घेऊन त्याची स्थापना करण्यात आली. जगातील मुलांचे जीवनमान सुधारणे हे 'युनिसेफ'चे उद्दिष्ट आहे.

'युनिसेफ' मुलांसाठी आरोग्य सेवा, लसीकरण, शुद्ध पाणी, पोषण आणि शिक्षण यांसारख्या आवश्यक मूलभूत सेवा पुरवते. याव्यतिरिक्त ती हिंसा, शोषण आणि भेदभाव दूर करण्यासाठी कार्य करते. गरिबी, युद्ध किंवा इतर आपत्कालीन परिस्थितींचा मुलांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या देशांमध्ये ही संस्था विशेष सक्रिय आहे. जगातील सर्वात लहान बेट राष्ट्र असलेल्या नाउरूमध्ये हरितगृह वायूंचे उत्सर्जन अत्यंत कमी आहे. आकाराने खूप लहान असलेल्या या देशाची लोकसंख्या खूपच कमी आहे. त्यामुळे त्याचे एकूण उत्सर्जन खूप कमी आहे. तुवालू या देशात हरितगृह वायू उत्सर्जन खूप कमी आहे. याचे मुख्य कारण म्हणजे त्याचा लहान आकार आणि मर्यादित औद्योगिकीकरण. भूतानमध्ये हरितगृह वायूंचे उत्सर्जन खूपच कमी आहे. याचे कारण तेथे अधिक जंगले आणि वनक्षेत्रे आहेत. ती कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात. माली हा पश्चिम आफ्रिकेतील एक अतिशय कमी औद्योगिकीकरण असलेला देश. तिथे हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी आहे. वातावरणातील बदलामुळे मुलांना पूर, उष्णतेची लाट, दुष्काळ अशा आपत्तींचा धोका तर वाढतोच; पण त्यांच्या आहारातील पोषक घटकही कमी होत आहेत. 'द स्टेट ऑफ द वर्ल्डस चिल्ड्रन' या अहवालानुसार हवामान–संबंधित आपत्ती, लोकसंख्येतील बदल आणि तंत्रज्ञानाच्या प्रवेशातील असमानता ही आजची मोठी आव्हाने आहेत.

२०२३ हे हवामान इतिहासातील आतापर्यंतचे सर्वात उष्ण वर्ष होते. यंदा जागतिक तापमानातील वाढ दीड अंश सेल्सिअसची लक्ष्मणरेषा ओलांडण्याची शक्यताही वर्तवली जात आहे. अशा परिस्थितीमध्ये हवामानाच्या वाढत्या धोक्यांचा परिणाम लहान मुलांवर अधिक गंभीरपणे होण्याची भीती या अहवालात व्यक्त करण्यात आली. पूर्व आणि दक्षिण आशिया तसेच पॅसिफिक, मध्य पूर्व, उत्तर, पश्चिम आणि मध्य आफ्रिकेतील देशांमध्ये अतिउष्णतेचा सामना करणाऱ्या मुलांच्या संख्येत सर्वात मोठी वाढ होऊ शकते, असे अहवालात म्हटले आहे. पुरामुळे पूर्व आफ्रिका आणि पॅसिफिक प्रदेशातील मुलांना सर्वात जास्त फटका बसण्याची शक्यता आहे. या संदर्भात 'युनिसेफ'च्या कार्यकारी संचालक कॅथरीन रसेल यांनी म्हटले आहे की, मुलांना हवामान आपत्तींपासून ऑनलाइन धोक्यांपर्यंत विविध प्रकारच्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. हे धोके काळाच्या ओघात अधिक गंभीर होतील. २०५० मध्ये चांगले भविष्य घडवण्यासाठी कल्पनेपेक्षा जास्त प्रयत्न करावे लागतील. या अहवालात लोकसंख्येमध्ये होणाऱ्या नाट्यमय बदलांवरही प्रकाश टाकण्यात आला आहे. यानुसार पुढील २६ वर्षांमध्ये उप–सहारा आफ्रिका आणि दक्षिण आशियामध्ये मुलांची लोकसंख्या सर्वाधिक असेल; आफ्रिकेत मुलांची संख्या सर्वाधिक असूनही ही लोकसंख्या ४० टक्क्यांच्या खाली पोहोचू शकते. २०००च्या दशकात लोकसंख्येतील हा हिस्सा सुमारे ५० टक्के होता. त्याचप्रमाणे, पूर्व आशियामध्ये २००० मध्ये असणारा २९ टक्के वाटा आता १७ टक्क्यांच्या खाली जाईल. पश्चिम युरोपमध्येही असेच काहीसे चित्र पाहायला मिळेल. या बदलांमुळे जगासमोर नवी आव्हानेही निर्माण होतील.

# बनवाट औषधांमुळे उपचार रामभरोसे

देवाचा प्रसाद ग्रहण करत असताना अगदी भक्तीभावाने घेतला जातो. तसेच डोळे बंद करून विश्वासाने गोळ्या औषधेही खाण्यात येतात. देवाच्या प्रसादावर जेवढा विश्वास ठेवण्यात येतो, तेवढाच विश्वास डॉक्टरांनी दिलेल्या गोळ्यांवर ठेवला जातो; परंतु जर गोळ्या–औषधच बनावट असतील, तर किंवा त्यामुळेच जीवाला धोका आहे, असे समजल्यावर त्या माणसांची काय अवस्था होईल? याचा नुसता विचार जरी केला तरी जिवाचा थरकाप उडतो. मराठवाड्यातील बीड, नांदेड, धाराशिव व छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयात बनावट औषधांचा पुरवठा झाल्याचे उघडकीस आले आहे. मराठवाड्यातील शासकीय रुग्णालयात बनावट औषधी व गोळ्यांचा पुरवठा करून रुग्णांसाठी त्याचा वापरही झाल्याचे उघडकीस आले आहे. नांदेडच्या जिल्हा शासकीय रुग्णालयातून मे २०२३ मध्ये न्यूक्लास ६२५ या गोळ्यांचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्या गोळ्यांचा अहवाल ऑक्टोबर २०२४ मध्ये प्राप्त झाला. त्यानंतर अन्न व औषध प्रशासन विभागाने १ लाख २३ हजार गोळ्यांचा साठा जप्त केला. दीड महिन्यापेक्षा अधिकचा काळ उलटूनही संबंधित कंपनीविरुद्ध कुठलाही गुन्हा दाखल करण्यात आला नाही. विशेष म्हणजे ज्या कंपनीने हा पुरवठा केला होता ती कंपनीच मुळात अस्तित्वात नाही, असे सुरुवातीच्या तपासात आढळून आल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे पुरवठादार व जिल्हा शासकीय रुग्णालयाची यामध्ये मिलीभगत असल्याचे बोलले जात आहे. धाराशिव जिल्ह्यातही औषध निर्मात्या कंपन्यांकडून आवश्यक गुणवत्ता नसणाऱ्या सहा प्रकारच्या गोळ्यांचा पुरवठा करण्यात आला होता. प्रयोगशाळेच्या अहवालानुसार तीन टप्प्यात जवळपास पावणेतीन लाख गोळ्या त्या कंपनीने परत बोलावून घेतल्या. औषध पुरवठा करणाऱ्या त्या एजन्सीला धाराशिवमध्ये काळ्या यादीत टाकण्यात आले आहेत. धाराशिव जिल्ह्यात आलेल्या सिप्रो–२५० एमजीच्या १ लाख ९ हजार २४०, सेफिक्सिम १ लाख १ हजार ३६२, सिप्रोफ्लोक्सासिन–५०० च्या ४० हजार २५८, एजिथ्रोमाइसिन १० हजार ८६४, अमॉक्सिसिलिन–३७५ च्या १९ हजार ६३०, अमॉक्सिसिलिन–६२५ च्या ७ हजार २४० अशा एकूण २ लाख ८८ हजारांहून अधिक गोळ्यांमध्ये आवश्यक गुणवत्ता नसल्याने संबंधित कंपनीला परत केल्या आहेत. यापैकी काही गोळ्या संबंधित कंपन्यांनी बदलून दिल्याचे समजते.

छत्रपती संभाजीनगरमधील घाटी रुग्णालयातही २३ प्रकारच्या औषधी संशयाच्या भोवऱ्यात आहेत. विशेष म्हणजे वरिष्ठांच्या आदेशानुसार त्या ३३ प्रकारच्या औषधींचा वापर थांबविण्यात आला. शिवाय यातील २६ प्रकारची औषधी संपलेली असल्याने ज्या औषधींचा वापर थांबविला आहे. त्याऐवजी पर्यायी औषधी रुग्णांना दिली जात असल्याचे घाटी येथील अधिष्ठाता यांनी सांगितले. मराठवाड्यातील बीड जिल्हा तसा नेहमीच चर्चेत असतो. बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयास बनावट औषधांचा पुरवठा करणारी एक टोळी उघडकीस आली आहे. मराठवाड्यात सर्वप्रथम या ठिकाणी बनावट गोळ्यांच्या पुरवठा झाल्याचे उघडकीस आल्यानंतर या प्रकरणात असलेल्या टोळ्याच समोर आल्या आहेत. अंबाजोगाई येथील रुग्णालयात ॲझिमॅसीन–५०० या औषधांचे सॅम्पल नमुने तपासणीसाठी घेण्यात आले होते. त्यांची तपासणी होऊन २३ ऑक्टोबर २०२४ रोजी आलेल्या अहवालात सदरील औषध हे रुग्णांसाठी निष्क्रिय व बनावट असल्याचे उघडकीस आले. या गोळ्यांमध्ये ॲजिथ्रोमायसीन हा घटक असणे अत्यंत आवश्यक होते; परंतु सदरील गोळ्यांमध्ये ॲजिथ्रोमायसीन नसल्यामुळे हा बनावट गोळ्यांचा प्रकार उघडकीस आला. किमान साडेआठ हजार रुग्णांच्या पोटात या गोळ्या गेल्या. यामधून जीवित हानी झाली नाही, असे सांगितले जात असले तरी या प्रकरणाच्या खोलाशी गेल्यास यामधून काहीतरी वेगळेच बाहेर येईल, असे या क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे. याप्रकरणी सुरेश दत्तात्रय पाटील, मिहीर त्रिवेदी (रा. भिवंडी जि. ठाणे), द्विती सुमित त्रिवेदी, (सुरत) व विजय शैलेंद्र चौधरी रा. मीरा रोड, ठाणे या चौघा जणांविरुद्ध गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे त्या औषधीच्या तक्रारीनंतर सव्वा वर्षाने अहवाल प्राप्त झाला व त्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला. म्हणजेच या दरम्यान हजारो रुग्णांच्या पोटात त्या गोळ्या गेल्या. त्या बनावट गोळ्या रुग्णांसाठी किती घातक ठरल्या हे आता शोधण्याची गरज आहे. मराठवाड्यात ज्या औषधी कंपनीने गोळ्या पुरवठा केल्यात त्यापैकी उत्तराखंडमधील ब्रिस्टल फार्मा, केरळमधील रिफंड फार्मा, बायोटेक फॉर्म्युलेशन व मेलबर्न बायो सायन्स तसेच एस एम एन लॅब या पाच कंपन्या बनावट असल्याचे समोर आले आहे. या कंपन्यांनी प्रत्येक ठिकाणी बनावट औषधांचा पुरवठा केला असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. त्यामुळे या कंपन्यांची औषधे असल्यास त्याबाबत त्वरित कळविण्यात यावे, असे पत्र संचालक कार्यालयातर्फे मराठवाड्यातील जिल्हा रुग्णालयांना पाठविण्यात आले आहेत. पूर्वी एक म्हण खूप प्रसिद्ध होती. शहाण्या माणसाने कोर्टाची व पोलीस स्थानकाची पायरी चढू नये, असे म्हटले जायचे; परंतु आता त्यामध्ये आणखी एक भर पडली आहे. शहाण्याला कधीही दवाखान्यात जाण्याची वेळ येऊ नये, असेच मराठवाड्यातील अनेक प्रकरणांवरून म्हणता येईल. आरोग्य यंत्रणेतील पुरवठादार तसेच ठेकेदार यंत्रणा रुग्णांच्या जीवावर उठली आहे. बनावट औषधांचा पुरवठा करून या लोकांनी काय साध्य केले हे नव्याने सांगण्याची गरज नाही. अन्न व औषधी प्रशासनाचा कारभारही रुग्णांसाठी जीवघेणाच ठरत आहे. तपासणीसाठी पाठविलेल्या गोळ्यांबाबतचा अहवाल सव्वा वर्षाने प्राप्त झाला आणि त्यानंतर गुन्ह्याची नोंद होते, म्हणजे आरोग्य यंत्रणा तसेच अन्न व औषध प्रशासन हे दोघेही चक्क झोपेत आहेत की काय? असेच म्हणण्याची वेळ अंबाजोगाई येथील बनावट गोळ्या प्रकरणानंतर सर्वांच्या लक्षात येत आहे. मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयात औषधी गोळ्यांचा वेगळाच काळाबाजार चालतो. या ठिकाणी दाखल असलेल्या रुग्णाला अनेकदा बाहेरून औषध–गोळ्या विकत आणाव्या लागतात.

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, नांदेड, बीड, धाराशिव, जालना, परभणी, हिंगोली यासह लातूर येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात सर्वत्र अलबेल कारभार आहे. रुग्णांना मिळणाऱ्या सुविधा, औषधोपचार व कर्मचारी व डॉक्टरांची वागणूक यावरून अनेकदा बाचाबाची होते, तसेच त्याचे पर्यवसान भांडणात झाल्याचे पाहावयास मिळते. रुग्णांचे वागणे प्रशासनाला कदाचित वाईट वाटणारे असेल; परंतु त्याच रुग्णांना दिले जाणारे बनावट औषध जीवघेणे ठरत आहेत. अशा परिस्थितीत दोष रुग्णांचा की आर्थिक फायद्यासाठी बनावट औषधी विक्रेते करणाऱ्या कंपन्यांचा व प्रशासनाचा? हा विचार कुठेतरी गांभीर्याने होणे गरजेचे आहे. मराठवाड्यात बोगस व बनावट औषधींच्या पुरवठ्यावरून पुन्हा एकदा रुग्णालयांची तसेच औषधांची खातरजमा करून त्यात दोषींविरुद्ध कडक शिक्षेची अंमलबजावणी व तरतूद आवश्यक आहे. नांदेडच्या डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय व शासकीय रुग्णालयात कुत्रा चावल्यानंतर आलेल्या रुग्णांना देण्यासाठी इंजेक्शनच उपलब्ध नसल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. जीव मुठीत घेऊन उपचार घेण्यासाठी आलेल्या रुग्णाला बाहेरच्या खासगी मेडिकलमधून इंजेक्शन विकत आणावे लागत आहे. हा प्रकार नित्याचाच झाला आहे. असाच एक प्रकार निवडणूक प्रचारादरम्यान घडला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी नांदेडमध्ये असताना दुपारी तीन वाजता एका ४० वर्षीय महिलेला सभेसाठी जाताना रस्त्यावरील कुत्र्याने चावा घेतला. त्यानंतर त्या महिलेने नांदेडच्या श्यामनगर येथील महिला रुग्णालयात धाव घेतली. त्या ठिकाणी कुत्रा चावल्यानंतर दिले जाणारे इंजेक्शन उपलब्ध नाही, असे रुग्णाला सांगितले . त्यांना शिवाजी पुतळा येथील सरकारी दवाखान्यात पाठविण्यात आले . त्या ठिकाणी गेल्यावर त्या महिलेला सांगण्यात आले की, या जखमेवर लागणारे तीन पैकी केवळ दोनच इंजेक्शन येथे उपलब्ध आहेत. त्यामुळे तुम्ही येथून आठ किलोमीटर दूर असलेल्या विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात जा. सदरील महिला विष्णुपुरी येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे गेल्यानंतर उपचार करत असलेल्या डॉक्टरांनी सांगितले की, तुम्हाला द्यायचे असलेले इंजेक्शन आमच्या शासकीय रुग्णालयात उपलब्ध नाही. तुम्ही ते बाहेरच्या खासगी मेडिकलमधून विकत आणा. ते इंजेक्शन रुग्णाला विकत आणावे लागले. त्यासाठी रुग्णाला ४६०० रुपयांचा खर्च आला. हा प्रकार आजही सुरूच आहे. जिल्हा शासकीय रुग्णालयात दररोज श्वान दंशाचे किमान २५–३० रुग्ण येतात. एकंदरीत पाहिले तर मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यात असलेल्या शासकीय रुग्णालयात होत असलेल्या औषधींच्या पुरवठ्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.बनावट औषधी असो की श्वानदंश असो, एखाद्याचा जीव गेल्यावर आरोग्य यंत्रणा जागी होणार आहे की काय? असा सवाल यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

# शेतकऱ्यांनी रेशीम शेती करून समृध्द व्हावे–जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ

## गावातील ७० शेतकऱ्यांनी केली नोंदणी

**जालना । असलम कुरेशी**

रेशीम शेती उद्योगाद्वारे शेतकऱ्यांना शाश्वत तसेच अधिक उत्पादन मिळत असून जालना जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी तुती लागवड करून आपला विकास साधावा. तरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी रेशीम शेती करुन समृध्द व्हावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले. रेशीम कोषांना चांगले दर मिळण्यासाठी उपलब्ध करून देणार ड्रायर तसेच रेशीम धागा निर्मितीचे लहान युनिट दि. ५ फेब्रुवारी २०२५ रोजी अंबड तालुक्यातील वडीकाळे येथे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत महारेशीम अभियान–२५ अंतर्गत शेतकरी मेळावा घेण्यात आला. या प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमासाठी उपविभागीय अधिकारी पुलकीत सिंह, तहसीलदार विजय चव्हाण, मंडळ कृषी अधिकारी एस.डी.पालवे, कृषी पर्यवेक्षक के.पी. कोकाटे, कृषी सहाय्यक जी.बी. उंडे, जिल्हा रेशीम




कार्यालयाचे वरीष्ठ क्षेत्र सहाय्यक शरद जगताप, सरपंच श्रीमती शिवनंदा भगवान ढेबे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ म्हणाले, पावसाळ्यात रेशीम कोषांना २५० ते ३५० रुपये प्रति किलो दर प्राप्त होतो तर नोव्हेंबर पासून पुढील कालावधीत रेशीम कोषांना ५०० ते ७०० रुपये प्रति किलो असा वाढीव दर मिळतो. शेतकरी नैसर्गिक रित्या रेशीम कोषांची साठवण करु शकत नाही, परंतु रेशीम कोषांना उष्णता देऊन सुकविल्यास दीर्घ काळ साठविता येतात, यामुळे कमी दर असताना शेतकऱ्यांनी आपले कोष ड्राय करून साठवावे व चांगले दर मिळत असताना त्याची विक्री करावी. या करीता शेतकरी गटास जिल्हा प्रशासनाद्वारे हॉट एअर ड्रायर समुहात देण्यात येईल तसेच ज्या शेतकऱ्यांना स्वत:चे कोषांपासुन त्यांचे गावातच रेशीम धागा बनवायचा आहे अशा गटास रेशीम धागा निर्मितीचे लहान मशीन उपलब्ध करून देण्यात येईल. जालना जिल्ह्यात रेशीम उद्योगातील सर्व प्रक्रियांची उभारणी करून हातमागावर रेशीम वस्त्रे तयार करण्याचे प्रशिक्षण केंद्राची उभारणी करण्यात येत आहे. सर्व प्रक्रियांची उभारणी जालना जिल्ह्यात झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या कोषांना चांगला दर मिळण्यास मदत होणार आहे. करीता जालना जिल्ह्यातील प्रमाणात शेतकऱ्यांनी मोठ्या नवीन तुती लागवडीसाठी नोंदणी करावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

एक एकर तुती लागवडी करीता मनरेगा योजने अंतर्गत अनुदान देण्यात येते तसेच एक एकर तुती लागवडी पासुन वर्षभरात २.५ ते ३ लाख पर्यंत रेशीम कोषांचे उत्पादन होते. महारेशीम अभियान–२५ अंतर्गत नोंदणी करावयाची अंतिम मुदत ९ फेब्रुवारी असुन या करीता शेतकऱ्यांनी जिल्हा रेशीम कार्यालयाशी संपर्क साधुन मोठ्या प्रमाणात नोंदणी करावी, असे आवाहन रेशीम विकास अधिकारी अजय मोहिते यांनी केले.

कार्यक्रमामध्ये वडीकाळे येथील १० वर्षापासुनचे रेशीम उत्पादक शेतकरी गणेश काळे व दादाराव काळे यांनी आपले त्यांना रेशीम शेतीमधुन कसा फायदा झाला याविषयी अनुभव कथन केले. रेशीम शेतीपासुन चांगले उत्पादन घेणारे शेतकरी गणेश काळे, दादाराव काळे, शंकर गाडेकर यांचा तसेच महारेशीम अभियानात चांगले काम करणारे मनरेगाचे कर्मचारी सुनिल काळे, नितेश कनके, राहुल शेळके यांचा जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ यांच्या आवाहनास प्रतिसाद देत वडीकाळे येथील ६० व कुकडगाव येथील १० अशा एकुण ७० शेतकऱ्यांनी तुती लागवडी करीता नोंदणी केली.

# विडा येथे ढकली हॉली बॉल स्पर्धेचे आयोजन

**विडा । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील विडा येथे छत्रपती शिवाजी महाराज व रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राज कला क्रीडा व सांस्कृतिक मंडळ चिंचवडगाव प्रशिक्षित शाखा कार्यालय विडा ता. केज या ठिकाणी शाखा कार्यालयाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज व रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ढकली हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले असून बीड जिल्ह्यातील व महाराष्ट्रातील हॉलीबॉल खेळ प्रेमींना आव्हान करण्यात आले असून स्पर्धेसाठी नोंदणी सुरू झाली असून सर्व हॉलीबॉल खेळप्रेमींनी स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी आपल्या आपल्या संघाची नोंदणी ७ फेब्रुवारी पासून करण्यासाठी राज कला क्रीडा सांस्कृतिक मंडळ प्रशिक्षण शाखा कार्यालय विडा तालुका केज जिल्हा बीड या ठिकाणी नोंदणी करण्यासाठी संपर्क करण्यात यावा असे आव्हान संस्थेचे अध्यक्ष अरविंद अंकुश गलांडे व शाखा कार्यालयाचे व्यवस्थापक श्री दीपक वाघमारे सिताराम सरवदे अनिल ढोबळे व तसेच विड या गावातील हॉलीबॉल खेळप्रेमी पंच कमिटी आदरणीय मंगेश देशमुख व किरण पटाईत व साहिल ढोबळे व तसेच प्रसाद पटाईत यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले असून तरी सर्व स्पर्धकांनी सहभागी होण्यासाठी विडा येथील राज क्रीडा मंडळासाठी संपर्क करून आपापल्या टीमची नोंद करून घेण्यात यावी असेआव्हान मंडळाच्या वतीने व पंच कमिटीच्या वतीने सर्व ही स्पर्धा ११ फेब्रुवारी रोजी सुरू होणार असून बक्षीस वितरण१९ फेब्रुवारी रोजी होणार आहे तरी हॉलीबॉल प्रेमींना जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभागी होण्याचे राज कला व सांस्कृतिक मंडळाच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

### पारनेर बसस्थानकाचे खा.लंके यांच्या हस्ते भूमिपूजन !

# २ कोटी ६६ लाख रूपयांचा निधी मंजुर ४० वर्षानंतर उभी राहणार नवी वास्तू

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

खासदार नीलेश लंके यांच्या पाठपुराव्यानंतर मंजुर करण्यात आलेल्या पारनेर येथील बसस्थानकाचे रविवार दि.९ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता खा. लंके यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात येणार असल्याची माहिती पारनेरचे नगराध्यक्ष नितीन अडसूळ व उपनगराध्यक्ष जयदा शेख यांनी दिली. पारनेर बसस्थानक सन १९८५ मध्ये बांधून पुर्ण झाल्यानंतर ४० वर्षांच्या कालखंडानंतर बसस्थानकाची वास्तू उभी राहणार आहे. बसस्थानकाच्या स्वच्छता गृहाच्या बाजूला असलेल्या मोकळया जागेत हे बसस्थानकाची वास्तू उभी राहणार असून



हे बांधकाम झाल्यानंतर जुन्या बसस्थानकाचे निर्लेखन करण्यात येणार आहे. त्यानंतर त्या जागेवर बीओटी तत्वावर व्यापारी संकुल उभे राहणार आहे. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर खा. नीलेश लंके यांनी पारनेर व सुपा बसस्थानकासाठी नवी इमारत तसेच व्यापारी संकुलासाठी पाठपुरावा सुरू केला होता.

कोरोना संकटामध्ये दोन वर्षे त्यात खंड पडला. सन २०२० पासून सन २०२४ पर्यंत खा. लंके यांनी या कामासाठी पत्रव्यवहार केला. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन या कामासाठी २ कोटी २५ लाख रूपयांचा निधी मंजुर होऊन राज्य परिवहन महामंडळाकडून निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात येऊन १५ मार्च २०२४ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला.पुढे काही तांत्रीक अडचणी निर्माण झाल्याने हे काम सुरू होउ शकले नाही. त्यामुळे खा. नीलेश लंके यांनी दि.२१ जानेवारी २०२५ रोजी राज्य परिवहन महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांकडे पत्रव्यवहार करून रखडलेल्या कामाकडे लक्ष वेधले होते. कामाला विलंब झाल्याने २ कोटी ६६ लाख रूपये अंदाजपत्रक असलेल्या कामास मंजुर देण्यात आली. रविवारी या कामाचे भूमिपूजन करण्यात येणार आहे.

# संतश्रेष्ठ तुकाराम यांचे ११ वंशज हभप शिरीष महाराज मोरे यांनी आत्महत्या केली

**पुणे । प्रतिनिधी**

दि. ५ फेब्रुवारी २०२५ रोजी तिर्थक्षेत्र देहू गावातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. संतश्रेष्ठ तुकाराम यांचे ११ वंशज आणि प्रसिद्ध व्याख्याते हभप शिरीष महाराज मोरे यांनी आपल्या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. बुधवार सकाळी ८.३० च्या सुमारास शिरीष महाराजांचे मृतदेह घरात आढळून आले. त्यांनी गळफास घेत आपले जीवन संपविले, ज्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. शिरीष महाराजांचे अकाली निधन त्यांच्या कुटुंबीयांसाठी आणि भक्तांसाठी मोठा धक्का ठरला आहे.त्यांचे पार्थिव शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात नेण्यात आले आहे. संध्याकाळी ४ वाजता देहू गावातील वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. शिरीष महाराज मोरे यांच्या निधनाने देहू गावावर दु:खाचा डोंगर कोसळला असून, त्यांच्याविषयी असलेल्या श्रद्धेचा आणि आदराचा भाव अनेक लोकांच्या हृदयात कायम राहील.



# डोक्यात लाकडाने मारहाण करून दुखापत केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता

### आरोपीतर्फे ॲड.अविनाश धायगुडे यांनी बाजू मांडली

**केज । प्रतिनिधी**

केज येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी मा.श्री. एन.डी.गोळे यांच्या न्यायालयाने आरोपी अंकुश धर्मराज गायकवाड याची डोक्यात लाकडाने मारहाण करून दुखापत केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता केली. आरोपीच्या वतीनेड.आर.एम.धायगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली ड.अविनाश धायगुडे यांनी काम पाहिले.

शिवीगाळ करून लाथा,बुक्क्याने, चापटाने मारहाण करू आशयाची फिर्याद दिल्यावरून आरोपी विरुद्ध गु.र.क्र.१४०/२०२३ कलम ३२४,३२३,५०४,५०६ भा.द.वि प्रमाणे गुन्हा नोंद झाला. तपासाअंती पोलिसांनी आरोपी विरुद्ध मा.न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले पक्षातर्फे मा.न्यायालयासमोर साक्षपुरावा झाला. प्रकरणात आलेल्या पुराव्यावरून व सरकार पक्षाचे म्हणणे व ऍड अविनाश धायगुडे यांचा युक्तिवाद ऐकूण मा.न्यायालयांनी आरोपीची निर्दोष मुक्तता केली.आरोपींच्या वतीने ड.अविनाश धायगुडे यांनी काम पाहिले तर त्यांना. ड.डी.ए.लोंढाळ,ड.ओ.ए.लोंढाळ ड.डी.डी. गडदे ,ड. पी.पी. धायगुडे यांनी सहकार्य केले.

# शेतकऱ्यांनी ग्रीस्टॅक योजनेअंतर्गत नोंदणी करुन आपला ओळख क्रमांक प्राप्त करावा

**जालना । असलम कुरेशी**

राज्यात ग्रीस्टॅक योजनेअंतर्गत शेतकरी माहिती संच तयार करुन शेतकऱ्यांना त्यांचे ओळख क्रमांक देण्याबाबतचे कामकाज मोहिम स्वरुपात दि. १६ डिसेंबर, २०२४ रोजीपासून राबविण्यात येत आहे. तरी सर्व शेतकरी बांधवांनी आपले सरकार सेवा केंद्राच्या माध्यमातून ग्रीस्टॅक योजनेअंतर्गत नोंदणी करुन आपला ओळख क्रमांक प्राप्त करुन घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा तालुकास्तरीय अंमलबजावणी समितीचे अध्यक्ष डॉ.श्रीमंत हारकर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

शासनाकडून ग्रीस्टॅक प विकसित करण्यात आले असून त्या माध्यमातून शेतकरी स्वतः अथवा आपले सेवा केंद्र, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसेवक व कृषि सहायक यांच्या माध्यमातून सदर योजनेअंतर्गत नोंदणी केलेल्या सर्व शेतकऱ्यांना विविध योजनेचा लाभ मिळणार आहे. पीएम किसान योजनेअंतर्गत अनुदान प्राप्त करण्यासाठी पात्र सर्व लाभार्थींना समाविष्ट करुन घेणे, शेतकऱ्यांना पिकासाठी कर्ज मिळवण्यासाठी, किसान क्रेडिट कार्ड आणि कृषी इन्फ्रास्ट्रक्चर फंड व शेतीच्या विकासासाठी इतर कर्ज उपलब्ध करुन घेण्यात सुलभता, पिक विमा, आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत शेतकऱ्यांचे देय नुकसान भरपाईसाठी शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करण्यात सुलभता, किमान आधारभूत किंमतीवर खरेदीमध्ये शेतक–यांचे नोंदणीकरण ऑनलाईन पध्दतीने होवू शकेल. शेतकऱ्यांसाठी कृषी कर्ज, वित्त, निविष्ठा आणि इतर सेवा देणाऱ्या यंत्रणांना कृषी सेवा सहजपणे उपलब्ध करुन देण्यासाठी सुलभता येईल. शेतकऱ्यांना विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी कृषि व संलग्न विभागांना योजनांचा लाभ वितरीत करण्यामध्ये सुलभता येईल. शेतक–यांना वेळेवर कृषि विषयक सल्ले, विविध संस्थांकडून शेतकऱ्यांना संपर्क करण्याच्या संधीमध्ये वाढीसह नाविन्यपूर्ण कार्यक्रमांच्या विस्तार, प्रचारात सफलता प्राप्त होईल. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालया समोर शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयांचे ठिय्या आंदोलन संपन्न

### चोखामेळाच्या शेतकऱ्यांच्या नावे फेरफार करा–ब्रिजेश जगतकर

**बीड । प्रतिनिधी**

परळी शहरापासून जवळच असलेल्या वसंत नगर, चांदापूर, डोंगरतुकाई देवी मंदिराचा पाठीमागील माळारान परिसरात गेल्या ५० वर्षापासून शासनाकडून मिळालेली जमीन आहे. तिला दुरुस्त करून तिला शेती योग्य तयार करण्यात आले आहे. काहीजण त्या ठिकाणी शेती करतात आपली उपजीविका भागवतात, अनेकांचा या शेतीवर दूध व्यवसाय चालतो, हालाखीच्या परिस्थितीमध्ये शेती करतात परंतु शेतकऱ्यांना शासनाच्या कुठल्याच योजना मिळत नाहीत, व कसले वेळोवेळी घोषित होणारे कृषीविभागाचे शासकीय, शासनाकडून बी बियाणे खते, साहित्य, शेती अवजारे मिळत नाही. अनुदान,पिक विमा, दुष्काळ निधी, तसेच कुठलीही शासनाची स्कीम किंवा योजना राबवता येत नाही. पी.एम.किसान योजना ही मिळत नाही. त्याचे मुख्य कारण म्हणजे २६ शेतकरी व त्यांचे कुटुंबीयाच्या नावे शेती आहे परंतु स्वतंत्र फेरफार व सातबारा नसल्याने या सामुदायिक संस्थेच्या सभासद शेतकऱ्यांना कुठलाही लाभ घेता येत नाही. व मिळत सुधा नाही. त्यासाठी अनेक वर्षा पासून शासन दरबार ठिय्या आंदोलनास बसलेले शेतकरी प्रत्येकाच्या नावे फेर –फार ओढावा व सातबारा मिळावी यासाठी लढा देत आहेत. हे सर्व मागासवर्गीय असल्यामुळे त्यांच्यावर अन्याय होत आहे. परळी तालुक्यातील अशाच इतर काही सामूहिक शेती करणाऱ्या संस्थांना जिल्हा प्रशासन, तहसील प्रशासन प्रत्येकाच्या नावे फेर–फार व सातबारा दिला आहे. तसाच फिर –फार व सातबारा चोखामेळा सामुदायिक सहकारी शेती संस्था मर्यादित परळी यांच्या नावे देण्यात यावा या मागणीसाठी. बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर चोखामेळाचे शेतकरी व शेतकऱ्याचे कुटुंबीय या आंदोलन करण्यासाठी बसले होते. लेखी स्वरुपात पत्र दिल्यानंतर व आपली मागणी लवकर पूर्ण करू या आश्वासनापोटी तीन दिवसा पासून चालू आसलेले आंदोलन तूर्त स्थगितकरण्यात आले आहे. आंदोलनामध्येब्रिजेश मेसाजी जगतकर, मुकुंद कोंडीबा जगतकर, सिताराम भोगाजी, जगतकर, विलास किशन जगतकर, दिलीप जगतकर, सुमित्रा लक्ष्मण जगतकर, रेखा जगतकर, रत्नाबाई जगतकर,जनाबाई उर्फ सुनीता कांबळे, तारामती गोदाम, रमेश ताटे, बालाजी मस्के, सूर्यकांत इंगळे, राजाभाऊ मस्के, सूर्यकांत इंगळे राजाभाऊ मस्के सचिन जगतकर, दीपक जगतकर, दशरथ इंगळे,अनिल जगतकर कुणाल गोदाम, विलास जगतकर, सरस्वती जगतकर, ज्योती जगतकर, राजेंद्र जगतकर, बंडू जगतकर, प्रदीप जगतकर, नहना जगतकर, जयश्री जगतकर, धम्मा जगतकर,कमल जगतकर,संदीप ताटे शेतकरी व कुटुंबीयांनी मागणीच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.



# स्नेह संमेलनाच्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना वाव मिळतो-लक्ष्मणरावजी बेडसकर

## स्वामी विवेकानंद विद्या मंदिर माध्यमिक विभाग या शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**केज । प्रतिनिधी**

जीवन विकास शिक्षण मंडळ केज,संचलित स्वामी विवेकानंद विद्या मंदिर माध्यमिक विभाग केज या शाळेमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्षा मधील स्नेह संमेलन कार्यक्रम अत्यंत हर्षोत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे उद्धाटक म्हणून श्री.लक्ष्मणरावजी बेडसकर गट शिक्षणाधिकारी,गटसाधन केंद्र पंचायत समिती केज तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री.अंकुशरावजी इंगळे अध्यक्ष,जीवन विकास शिक्षण मंडळ केज हे उपस्थित होते.तर प्रमुख उपस्थिती मध्ये संस्थेचे संचालक नारायण अण्णाअंधारे,सौ.शैलाताई इंगळे अध्यक्षा,शालेय व्यवस्थापन समिती मा. वि.केज,शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे,गणेश कोकीळ प्राचार्य,स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल केज, सेवानिवृत्त शिक्षक हनुमंत घाडगे आदी उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात प्रमुखउद्धाटक लक्ष्मणराव जी बेडसकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली.या प्रसंगी सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे व शाळेतील विद्यार्थिनींच्या ' स्वागताशी पाहुण्यांच्या, झाली फुले कळ्याची' या स्वागत गीताने उपस्थित प्रेक्षकांची मने वेधली. यावेळी बोलताना लक्ष्मणरावजी बेडसकर म्हणाले, स्नेहसंमेलना सारख्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो यामधून आदर्श कलाकार घडतात.सर्व सहभागी कलाकारांना पालक खूप चांगल्या प्रकारे प्रोत्साहित करतात असे मत व्यक्त केले.सहभागीविद्यार्थ्यांनी शेतकरी,धनगर लोकगीत, राजस्थानी घूमरलोकगीत नाटक मले बाजाराला जायचं माय,कश्मीरी लोकनृत्य,ऐतिहासिक हिरकणी लोकनृत्य, मराठमोळी लावणी नृत्य, सादर केली.पोतराज लोकनृत्य प्रेक्षकांचे विशेष आकर्षण ठरले.मराठी, हिंदी,लोक गीत,गोंधळ, भारुड अशा विविध गीता वर नृत्य सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रमाचे नियोजन शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षकवृंद यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे, सहाय्यक कल्याण आदमाने यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.






आष्टी-पाटोदा-शिरूर मतदार संघाचे आ.सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त पाटोदा तालुक्यातील अंमळनेर येथील गहिनीनाथ वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.यावेळी ड.एन.एन. साबळे,पत्रकार चंद्रकांत पवार, अभिराज पवार यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.यावेळी पत्रकार बबनराव उकांडे, भाऊसाहेब पवार,अक्षय बेद्रे आदीसह भारत पवार तसेच वस्तीगृहाचे कदम उपस्थित होते.

# अ.भा.समाजवादी, शिक्षण हक्कसभा च्या वतीने ९ फेब्रुवारी रोजी शैक्षणिक चर्चासत्राचे आयोजन

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभा, शाखा अंबाजोगाई यांच्या वतीने दि.९ फेब्रुवारी रविवार रोजी सायं ४:३० ते ७:०० या वेळेत श्री योगेश्वरी नूतन विद्यालयाच्या गोटे गुरुजी सभागृहात नविन शैक्षणिक धोरण २०२० आणि भारतीय ज्ञान प्रणाली या विषयावर एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्रासाठी अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ. सुरेश खुरसाळे यांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापुरकर यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत हे चर्चासत्र होणार आहे. नवीन शैक्षणिक धोरणाच्या संदर्भाने भारतीय ज्ञान प्रणाली (आय के एस) या संकल्पनेबाबत चर्चा व मार्गदर्शन करण्यासाठी शैक्षणिक चळवळीतील ज्येष्ठ शिक्षणतज्ञ तथा अखिल भारतीय शिक्षण हक्क सभेचे राज्यकार्याध्यक्ष डॉ. शरद जावडेकर हे प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत. तसेच म. गांधी अध्यासन केंद्राच्या संचालिका प्रा. डॉ.शैलेजा बरुरे या विषयासंदर्भात आपले विचार मांडणार आहेत. मा. शरद जावडेकर यांनी केजी ते पिजी सर्वांना समान व मोफत शिक्षणाच्या हक्कासाठी महाराष्ट्रभर शैक्षणिक चळवळ उभी केलेली आहे. तसेच नुकताच खाजगी शाळांमध्ये आर टी ई प्रवेश संदर्भातील चुकीच्या धोरणांविरोधात न्यायालयीन लढा जिंकून सर्वसामान्य विद्यार्थ्यांना खाजगी शाळांमध्ये (२५%) प्रवेशाचा मार्ग खुला करण्यात त्यांचा खूप मोठा वाटा आहे. वीस वर्षांपासून त्यांनी केलेल्या शैक्षणिक कार्याची दखल घेत महाराष्ट्र फौंडेशन या संस्थेचा सामाजिक कार्यकर्ता हा अत्यंत मानाचा पुरस्कार त्यांना प्राप्त झालेला आहे. शरद जावडेकर यांचे विचार ऐकण्याची संधी या चर्चासत्रातून आपणास प्राप्त होत आहे. तरी अंबाजोगाई शहर व परिसरातील शिक्षक, प्राध्यापक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील कार्यकर्ते, पत्रकार व सर्व स्त्री-पुरुष नागरिकांनी या चर्चासत्रात सहभागी व्हावे. तसेच आर टी ई अंतर्गत शालेय प्रवेश प्रक्रियेशी संबंधित पालकांनाही या चर्चासत्रात सहभागी व्हावे. असे आवाहन आयोजक अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभा अंबाजोगाई च्या वतीने करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांनी जीवनाची दिशा निश्चित करून ध्येयाकडे वाटचाल करावी-व्यंकटराव रेड्डी

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

अंबाजोगाई विद्यार्थ्यांनी स्वतःतील गुण, क्षमता आणि कमतरता ओळखून जीवनाची दिशा निश्चित करून ध्येयाकडे वाटचाल करावी असे विचार लोकमान्य टिळक विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक व्यंकटराव रेड्डी यांनी व्यक्त केले. पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयात संपन्न झालेल्या 'विद्यार्थी वार्षिक स्नेह संमेलन बक्षीस वितरण' कार्यक्रम प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.



विद्यार्थ्यांना संबोधित करताना रेड्डी म्हणाले की, शाळेने केलेल्या संस्कारांचा उपयोग करून आपण सातत्य, मनन, चिंतन यातून ध्येय प्राप्ती कडे वाटचाल करावी जेणेकरून आपल्या प्रगतीचा मार्ग सुकर होईल. संमेलनाच्या माध्यमातूनच विद्यार्थ्यांमध्ये धाडस, निर्भयता आणि आत्मविश्वास निर्माण होतो. यातुन विद्यार्थ्यांची खरी जडण-घडण होते. विद्यार्थ्यांनी भावी काळाचे योग्य नियोजन करत आई, वडील आणि गुरुजनांचे स्वप्न पूर्ण करावे असे विचार शेवटी त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमात अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक संजयराव विभूते आणि संमेलन प्रमुख ज्ञानेश मातेकर उपस्थित होते. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविकात संमेलन प्रमुख ज्ञानेश मातेकर यांनी विविध मंडळांतर्गत स्नेह संमेलनानिमित्त घेण्यात आलेल्या वैशिष्ट्य पूर्ण स्पर्धेची नाहितो दिली. अध्यक्षीय समारोपात संजय विभूते यांनी बक्षीस पात्र विद्यार्थ्यांचे कौतुक करत भविष्यात विद्यार्थ्यांनो समाज आणि राष्ट्राच्या विकासासाटो आपल्यातील कलागुणांचा वापर करावा असे प्रतिपादन केले. या बक्षीस वितरण समारंभ प्रसंगी सर्व मान्यवरांच्या हस्ते वार्षिक स्नेह संमेलनातील विविध स्पर्धेतील यशवंत आगि नागपूर येथील एकलव्य स्पर्धा परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे बक्षीस देऊन कौतुक करण्यात आले. अतिशय उत्साहात संपन्न झालेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णू तेलंगे, वैयक्तिक पद्य कु. नेहा वाघमारे तर आभार प्रदर्शन राकेश मोरे यांनी केले. कार्यक्रमाचो सांगता शांतिमंत्राने करण्यात आली. कार्यक्रमासाठी सर्व विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

# खो-खो विश्वचषक विजेती कर्णधार प्रियंका इंगळेचा जनविकास महाविद्यालयात भव्य सहकुटुंब सत्कार

## प्रियंकाने भारताचे नाव जगात गाजवले-डॉ बाबासाहेब गोरे

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील बनसारोळा येथील जनविकास महाविद्यालयात भारताची पहिली महिला खो-खो विश्वचषक विजेती कर्णधार प्रियंका हनुमंत इंगळे हिच्या दैदीप्यमान यशाबद्दल जनविकास महाविद्यालयात सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब गोरे, सत्कारमूर्ती प्रियंका इंगळे तसेच प्रियंकाच्या मातोश्री सौ. सविता इंगळे, वडील श्री. हनुमंत इंगळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रियंका इंगळे हिचा सत्कार महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. बाबासाहेब गोरे यांच्या हस्ते बुके, शॉल,स्मृतीचिन्ह व रोख ११०००/- रुपये देऊन सहकुटुंब सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देत असताना प्रियंका इंगळे हिने खो-खो खेळाविषयीचे स्वअनुभव सांगून विद्यार्थ्यांनी जे कोणते क्षेत्र निवडले आहे त्या क्षेत्रात स्वतःला झोकून देऊन परिश्रम केले पाहिजेत असे मत व्यक्त केले.




अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ.बाबासाहेब गोरे यांनी प्रियंकाची कौटुंबिक पार्श्वभूमी सामान्य असतानाही तिने स्वकर्तत्वाने खो-खो सारख्या खेळात सातत्य ठेवून देशातील विश्वचषक खो-खो टीमचे नेतृत्व करून देशाला पहिला विश्वचषक मिळवून देण्याचे काम केले, हे अतिशय महत्त्वाचे असून आमच्या परिसरातील व आमच्या आप्तस्वकीयातील प्रियंकाचा व तीने केलेल्या कामगिरीचा आम्हाला अभिमान असल्याचे मत त्यांनी व्यक्त व्यक्त करून तिच्या पुढील वाटचालीस त्यांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रो. डॉ. गोपाळ भोसले यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्राध्यापक डॉ.सतीश कदम यांनी मानले. या कार्यक्रमास प्रियंका इंगळे यांचे नातेवाईक गावातील ग्रामस्थ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होत

# संत गोपाळबुवा महाराज शुगर ॲग्रो फुड कारखान्याच्या माध्यमातुन शेतकर्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडवणार-चेअरमन राजेश कराड

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

लातूर जिल्यातील रामेश्वर येथिल संत गोपाळबुवा महाराज शुगर अँड ॲग्रो फुट इंडस्ट्रीज,च्या माध्यमातुन आता खर्या अर्थाने शेतकर्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडवल्याशिवाय रहाणार नाही. इतर कारखान्याबरोबरच ऊस उत्पादकांना भाव देण्याची हमी चेअरमन राजेश कराड यांनी दिली. शिक्षण सम्राट डॉ.विश्वनाथ कराड तथा आ.रमेशआप्पा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली अल्पावधीत कारखान्याची उभारणी झाली असुन येणार्या विजयादशमीच्या शुभ मुहुर्तावर आपण प्रत्यक्ष गाळप चालु करणार असल्याचे ते म्हणाले.

या कारखान्याचा प्रथम बॉयलर अग्नीप्रदिपन समारंभ दि. ४ फेब्रुवार मंगळवार रोजी कारखाना साईडवर विधीवत पुजा यज्ञ करून संपन्न झाला. या प्रसंगी प.पु.विद्यानंद सागर महाराज, ह.भ.प.नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरी, ह.भ.प. लालासाहेब नाना पवार, ह.भ.प. बाबा महाराज बोराडे, नाथसिंह मालक देशमुख, मुख्य प्रवर्तक तुळशीराम दादा कराड, भाजपा प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांच्यासह आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती होती. होम हवन करून अग्नी प्रदिपन संत महंतांच्या उपस्थितीत संपन्न झाल्यानंतर शेतकरी मेळावा याच ठिकाणी पार पडला. व्यासपीठावर सर्व मान्यवरांचा सत्कार कराड कुटुंबियांच्या वतीने केल्यानंतर विद्यानंद सागर महाराज यांच्यासह संत महंतांनी आशिर्वादपर मनोगत व्यक्त केले. विद्यानंद सागर महाराज यांनी तर कराड कुटुंबिय सामाजिक परोपकाराने कशा प्रकारे काम करतं ? हे सांगताना डॉ.विश्वनाथ कराड यांच्या सामाजिक योगदानाचे कौतुक केले. नाथसिंह मालक यांनी कारखान्याकडून अपेक्षा व्यक्त करताना शेतकर्यांच्या ऊसाला योग्य भाव मिळवुन देण्याची सुचना केली. यावेळी ऊस उत्पादकांना बोलताना चेअरमन राजेश कराड म्हणाले की, माय-बाप जनतेच्या आशिर्वादाने विधानसभा निवडणुकीत रमेश आप्पा विजयी झाले. आमचं राजकारण सकारात्मक आणि जनतेच्या हिताचे आहे. या भागातील शेतकर्यांचं ऊसाच्या प्रश्नावरून मागच्या अनेक वर्षापासून राजकारण व्हायचं ते आम्ही डोळ्यांनी पहायचो, आमच्या कुटुंबियांकडे शंभरावर एकर जमिन असली तरी आम्हाला देखील ऊसाच्या प्रश्नावर चटके बसले. या भागात ऊस उत्पादकांच्या कल्याणासाठी कारखानदारी असावी हे स्वप्न डॉ.विश्वनाथ कराड आणि रमेश आप्पा कराड यांच्यासह संपुर्ण कुटुंबियांचं होतं. त्यांच्या मार्गदर्शनाखाली एक वर्षात या कारखान्याची प्रत्यक्ष उभारणी झाली असुन येणार्या विजयादशमीला प्रत्यक्ष गाळप सुरु करून इतर कारखान्याच्या बरोबरीने भाव देणार असल्याची हमी कराड यांनी दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवा नेते ऋषीकेश कराड यांनी केले तर सौरभ कराड, तेजस कराड यांची उपस्थिती होती. कारखान्याला अर्थसहाय्य करणार्या बँकेचे वरिष्ठ अधिकारी तसेच पंचक्रोशीतील मोठ्या प्रमाणावर ऊस उत्पादकांची उपस्थिती होती.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077